ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# कौटुंबिक वातावरणाचा मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे

Sheela B. Jire[1] , प्रा. डॉ. उज्वला किशोर वैरागडे[२]
[२]संशोधक मार्गदर्शक , अधिव्याख्याता , सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक,
डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालय, औरंगाबाद.



**प्रस्तावना:-**

कुटुंब ही मुलभूत आणि सामाजिक संस्था समजली जाते. मानवी समाजातील प्रत्येकजण कुटुंबाशी परिचित असतो. मुलांचा जन्म, संगोपन व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास कुटुंबातच होतो.

समाजाला कोणत्या गोष्टी मान्य आहेत व कोणत्या मान्य नाहीत यांचे शिक्षण बालकाला घरातून मिळते. एक प्रतिष्ठित नागरिक म्हणून मूल स्वतंत्र जीवन जगू लागते. मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे. बालसंगोपनाबद्दल अद्यापदेखील आपली कल्पना स्पष्ट नाही. संगोपन म्हणजे बालकाचे थंडी वाऱ्यापासून, तहान-भूकेपासून, रोगराई तसेच घात-अपघातापासून निवारण करणे एवढेच आहे का ? बालकाच्या शरीरिक गरजा जशा महत्वाच्या असतात तशाच मानसिक गरजाही मोलाच्या असतात. बालकाला अन्नाइतकीच प्रेमाची भूक असते. साहसासाठी आत्मविश्वास मिळवायचा असतो. कौतुकातून प्रोत्साहित व्हायचे असते. इतरांकडून प्रेम, माया, ममता, आपुलकी, जिव्हाळा याची नितांत गरज असते. आपल्या सुखदुखात समरस होणारी आपणास समजून घेणारी माणसे आहेत याचे फार मोठे समाधान बालकाला असते. हे सारे बालकाला कुटुंबात मिळू शकते. कुटुंबसंस्था ही अनौपचारीक शिक्षणसंस्था असली तरी व्यक्तीच्या जीवनात फार मोठे मोलाचे कार्य करणारी आधारभूत संस्था आहे. मॅकआयव्हर व पेज यांच्या मते "कुटुंब म्हणजे लैंगिक संबंधावर आधारीत पुरेसा सुनिश्चित प्रजोत्पादन करणारा आणि प्रजासंगोपन करणारा समूह होय".

**कुटुंबाचे मुख्यत दोन प्रकार पडतात : संयुक्त आणि विभक्त**

**संयुक्त कुटुंब :-** संयुक्त कुटुंबामध्ये पालक व मुले यांच्या व्यतिरिक्त आजी-आजोबा, काका-काकू, आत्या, चुलत भावंडे अशा इतरही सदस्यांचा समावेश होतो.

**विभक्त कुटुंब :-** विभक्त कुटुंब पालक व त्यांची मुले यांचे मिळून बनलेले असते. त्यामुळे पालकांच्या भूमिकेमध्ये लवचीकता आढळते. पालक आपल्या जबाबदाऱ्या वाटून घेतात. पालक-बालक संबंध फार जवळचे असतात. मुलांच्या विकासावर पालकांनी पूर्ण लक्ष केंद्रित केलेले असते.

**व्यक्तिमत्व :-**

व्यक्तिमत्व हा शब्द 'पर्सनॅलिटी' या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द आहे. तर Personality हा शब्द लॅटिन भाषेतील पर्सोना या शब्दापासून तयार केलेला आहे याचा अर्थ मुखवटा असा आहे.

गॉर्डन ऑलपोर्ट यांच्या मते "व्यक्तीचे वैशिष्ट्यपूर्ण वर्तन व तिचे विचार निर्धारित करणाऱ्या तिच्या मनोशारीरिक यंत्रणेच्या गतिशील संघटनाला व्यक्तिमत्व असे म्हणतात".

**व्यक्तिमत्वावर परिणाम करणारे घटक :-**

मानवी व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर विविध घटकांचा प्रभाव पडत असतो.

**A.मनोसामाजिक घटक**

कुटुंब
सामाजिक वातावरण
शालेय वातावरण
शेजारी
समवयस्कांचा प्रभाव
संस्कृती

## B. कुटुंब :-

व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांमध्ये कुटुंब हा खूपच महत्वाचा घटक मानला जातो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडणारे घटक खालील प्रमाणे.

a. कुटुंबाची संरचना
b. कौटुंबिक वातावरण
c. कौटुंबिक नातेसंबंध

### कौटुंबिक वातावरण :-

कौटुंबिक वातावरणात कुटुंबाच्या आर्थिक, सामाजिक स्थितिचा, भावनिक, नैतिक, बौध्दिक इ. बाजुचा समावेश होतो. संशोधकाच्या मतानुसार केवळ कुटुंबाची रचना बालकाच्या विकासावर परिणाम करीत नाही तर अनुकुल वातावरण निर्माण करण्याची पालकांची क्षमतासुध्दा बालकाच्या विकासावर परिणाम करते.

### कौटुंबिक वातावरणाचा मुलांच्या विकासावरती होणारा प्रभाव.

### अ) आईच्या नोकरी करण्याचे परिणाम :-

अनेक संशोधन अभ्यासांमध्ये असे आढळते की, ज्या कुटुंबामध्ये आई नोकरी, व्यवसाय करते तेथील मुलांना या गोष्टीचा व्यक्तिमत्व विकासात फायदा होताना दिसतो. डेमो हे आपल्या संशोधन अभ्यासाद्वारे असे सांगतात की जी आई तिच्या जीवनात अधिक समाधानी असते ती आई एक पालक म्हणून देखील अधिक यशस्वी ठरते, आई काम करीत असलेल्या कुटुंबातील मुलांना अधिक सक्षम, स्वावलंबी होण्यास उत्तेजन, प्रेरणा मिळते, तसेच त्यामूळे त्यांचा स्व आदर देखील वाढतो.

### ब) वडिलांच्या नोकरी करण्याचे परिणाम :-

वडील जेंव्हा कामामध्ये समाधानी असतील तर मुलांवर लक्ष केंद्रीत करीत असल्यामुळे मुलांचा फायदा होता, तर काही वेळा वडील स्वतःच जर नोकरीत समाधानी नसतील व त्यांच्या कामाशी संबंधित ताण-तणावांचा परिणाम कुटुंबावर, मुलांवर पडत असेल तर त्यातून मुले असमाधानी होतात.

### क) गरिबी व पालकत्व :-

जे पालक आर्थिकदृष्टया दुर्बल प्रकारात मोडतात त्यांच्यात चिंता, वैफल्य, चिडचिड या गोष्टी अधिक प्रमाणात आढळतात, काही कुटंबात तर असे पालक हिंसक, आक्रमक वर्तन करतांनाही आढळतात. अशा कुटुंबातील मुलांना भावनिक, सामाजिक व वर्तन स्वरुपाच्या समस्यांचा सामना करावा लागतो. अशा मुलांमध्ये, नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव, समवयस्कांसोबत समायोजनात अडथळे यां सारख्या तीव्र समस्या आढळतात.

### ड) आई-वडील यांचे परस्परांतील संबंध :-

आई-वडीलांचे एकमेकांशी न पटणे यांच्यामध्ये काही कारणांनी मतभेद असणे, भांडणे व संघर्ष होणे असे जर सतत घडत असेल तर असे आई-वडील बालकाचे संगोपन नीटपणे करु शकत नाहीत, त्यास आई-वडीलांचे प्रेम मिळत नाही, त्यांच्याकडून संरक्षण मिळत नाही व लक्ष दिले जात नाही पर्यायाने बालक असमाधानी, अतृप्त राहते व येथूनच वर्तन समस्येस सुरुवात होते.

### इ) आई-वडीलांची विभक्तता, घटस्फोट किंवा एका पालकाचा मृत्यू :-

कधी-कधी पती व पत्नीस वेगवेगळया शहरात नोकरीच्या निमित्ताने राहावे लागते. बहुधा अशावेळी मुले आईजवळ असतात त्यामुळे त्यांना वडीलांचा सहवास फारच थोडा मिळतो, तसेच आई-वडीलांचा घटस्फोट झाला असेल तर बालकास आईजवळ किंवा क्वचितप्रसंगी वडीलांजवळ राहावे लागते. बालकास आई व वडील या दोघांचेही प्रेम व सहवासाची गरज असते.

### ई) आई-वडीलांच्या वागणुकीतील संदिग्धता :-

आई-वडीलांची वागणुक बालकास गोंधळात टाकणारी असेल किंवा स्पष्ट नसेल तर बालकावर त्याचा परिणाम होतो कारण बालक आई-वडीलांचे अनुकरण करीत असतो. परंतु अशा स्थितीत नेमके कसे वागावे हे त्यांना कळत नाही व ते भांबावून जातात. त्यामुळे मानसिक ताण निर्माण होतो व याचा प्रभाव बालकाच्या वर्तनावर होतो.

### ड) कुटुंबातील संघर्षमय वातावरण :-

काही कुटुंबातील प्रौढ व्यक्तींमध्ये संघर्ष होत असतांना दिसतात. कुटुंबातील सदस्य एकमेकांशी भांडणे, वादावादी, मारामारी, शिवीगाळ करणे असे वर्तन करतात हे पाहिल्यावर मुले घाबरतात व गोंधळून जातात त्यांना भिती वाटते व त्याचे पर्यवसान विविध वर्तन समस्यांच्या स्वरुपात दिसू लागते.

आई-वडीलांमधील संघर्ष विकापाला गेलेले असतात. मारहानीचे प्रसंग मुलांच्या डोळयासमोर घडतात. असे झाल्यास मुलांच्या संवेदनाशिल मनावर विपरीत परिणाम होतो.

### ण) पालक-बालक संबंध :-

नवजात अवस्थेपासून शिशुला संरक्षणाची, प्रेमाची, वात्सल्याची, संगोपनाची नितांत गरज असते. त्यामुळे जन्म झाल्याच्या क्षणापासुन मातेचे संबंध आपल्या अपत्याशी यानंतर पित्याशी त्याचा परिचय होऊ लागतो. दोंघाकडुन त्याला हवीती माया सहानुभूती व प्रेम मिळण्यात बाधा निर्माण झालेली असेल तर तो या गोष्टींपासून वंचित राहतो किंवा दुखी होतो, मनावर दडपण येते त्यांच्यामध्ये बालकांच्या संगोपनाबद्दल एकमत असेल तर त्यांचे संगोपन योग्य पध्दतीने होते. आई-वडील दोघांच्याहीकडून त्याला संरक्षण मिळाले पाहिजे. पालकांचे दुर्लक्ष होणे हे शिशुच्या वर्तनसमस्येची सुरुवात होण्यास कारणीभूत ठरते. पालक व बालक यांच्यामधील संबंध जेवढे दृढ असतील तेवढे त्याला अधिक मानसिक समाधान मिळते व वर्तन समस्या निर्माण होण्याची संभावना कमी होते.

डॉ.श्रीधर नार्वेकर यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या कुटुंबात पालक-बालक संबंध सलाख्याचे असतात त्या कुटुंबात बालकाच्या विकासाला मदत होते. पालक फार कडक असतील, मुलांना सतत शिक्षा करत असतील तर मुलांच्या मनावर सतत दडपण राहते आणि कोणतेही काम किंवा क्रिया करतांना सतत चुकांमूळे क्रिया पुर्ण न करता अर्धवट सोडली जाते आणि मुलांचा आनंद कमी होतो. अधिकार गाजवणारे पालक असल्यास मुलाला कोणतीही कृती शिकण्याची स्वतंत्रता राहत नाही. प्रत्येक कृती पालकांच्या इच्छेनुसारच करावी लागते आणि त्यामुळे कृती शिकण्याची सहजता कमी होते आणि विकासाला विलंब होतो.

### उद्देश :-

१. बालकांचा व्यक्तीमत्व विकास उत्तम प्रकारे घडवून आणणे.
२. बालकांच्या सर्वांगिण विकासास पूरक वातावरण निर्माण करणे.
३. पालक-बालक संबंध मजबुत करण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे.
४. पालक-बालक आंतरक्रिया चांगल्यारीतीने घडवून आणणे.
५. बालकांच्या बध्दीमत्तेचा विकास उत्तम प्रकारे घडवून आणणे.
६. बालकांचे सामाजिक, मानसिक व भावनिक भाषिक, संभाषण कौशल्य इ. विकसित करण्यास मदत करणे.
७. चांगला नागरिक निर्माण करणे.
८. चांगला समाज घडविण्यासाठी वातावरण निर्माण करणे.

### गृहीतके :-

१. कौटुंबिक वातावरणाचा मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर परिणाम होतो.
२. पालक व बालक यांच्यात असणाऱ्या चांगल्या संबंधामुळे मुलांचा व्यक्तीमत्व विकास चांगला होतो.
३. पालक-बालक यांच्यातील संबंध जर चांगले नसतील तर त्याचा मुलांच्या व्यक्तीमत्व विकासावर विपरीत परिणाम होतो.
४. कौटुंबिक वातावरणाचा मुलांच्या भावनिकतेवर परिणाम होतो.
५. कौटुंबिक वातावरणाचा मुलांच्या वर्तनावरती परिणाम होतो.
६. मुलांमध्ये आदर भावना निर्माण होते.

### संशोधनाचे महत्व :-

एक चांगला समाज तयार करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचा सहभाग असणे गरजेचे असते आणि चांगला व्यक्ती / नागरीक बनण्यासाठी कारणीभूत असते ते कुटुंब व कुटुंबात राहणाऱ्या प्रत्येक सदस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध चांगल्या संबंधातून एक उत्तम नागरीक घडतो.

**साधने :-** पालक आणि बालक यांच्यातील सदोष संबंध चाचणी - चव्हाण आणि शर्मा

**चाचणीमध्ये दिलेल्या परिस्थितीचे स्पष्टीकरण :-**

१. Rejection व Acceptance या दोन विरुध्द बाजू आहेत. त्यात Rejection यातून पालकाची मुलांबाबत सकारात्मक अभिवृत्ती दिसून येते. तर Acceptance यात पालकांची मुलांबाबत सकारात्मक अभिवृत्ती दिसून येते.
२. Carelessness व Over-Protection या दोन विरुध्द बाजू आहेत. त्यात पालकांचे मुलांकडे लक्ष नाही. तर Over-Protection यात पालक मुलांकडे अतिलक्ष देतात हे दिसून येते.
३. Negligence व Over-Indulgence या दोन विरुध्द बाजू आहेत. Negligence यात पालक मुलांना मदत करत नाहीत त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. तर Over-Indulgence यात पालक मुलांच्या सर्व मागण्या पुर्ण करतात हे दिसून येते.
४. Strong-Realism व Utopian-Expectation या दोन विरुध्द बाजू आहेत. Strong-Realism यात पालकांच्या बालकांकडून कोणत्याही अपेक्षा नसतात तर Utopian-Expectation यात पालकांच्या बालकांकडून खूप अपेक्षा असतात.
५. Lenient Standards व Severe Moralism या दोन विरुध्द बाजू आहेत. Lenient Standards यात पालक आपल्या मुलांच्या चुकांकडे लक्ष देत नाही तर Severe Moralism यात मुलांकडून एकही चूक होणे पालकांना अपेक्षित नसते.
६. Total Freedom व Severe Discipline यादोन विरुध्द बाजू आहेत. Total Freedom यामध्ये पालक मुलांना पूर्ण स्वतंत्र्य देतात. Severe Discipline यात पालकांचे मुलांवरती नियंत्रण असते.
७. Marital Conflict व Marital Adjustment या दोन विरुध्द बाजू आहेत. यात Marital Conflict आई व वडील यांच्यामध्ये वाद होतात व मुलांसमोर त्यांच्यामध्ये भांडण होतात तर Marital Adjustment यात आई व वडील हे नेहमी संतुष्ट असतात व यामूळे मुलेही नेहमी आनंदी राहतात.
८. Faulty Role Expectation व Realistic Role Expectation या दोन विरुध्द बाजू आहेत. Faculty Role Expectation यात पालक नैतिक मूल्य, संस्कार यांना महत्व देत नाही, तर Realistic Role Expectation यात नैतिक मूल्य, संस्कार, खरेपणा यांना पालक खुप महत्व देतात.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद शहरातील १०० पालकांचा नमुना घेण्यात आला त्यात ५० आई व ५० वडील यांचा समावेश होतो. १०० पालकांना सदोष संबंधाची चाचणी देण्यात आली.

**चर्चा :-**

प्रस्तुत संशोधनासाठी पालकांना पालक-बालक संबंधाची चाचणी देण्यात आली. यात आठ परिस्थिती दिलेल्या होत्या. त्या प्रत्येक परिस्थितीस दोन बाजू दिलेल्या होत्या. त्या दोन मधून पालकांना एकास गुण दयावयाचे होते.

**जसे की पहिल्या ते आठव्या परिस्थितीबाबत :-**

- पहिल्या परिस्थितीस आर.जी.सी.टी. (रीजेक्शन) विरुध्द ऐ.सी.पी.टी. (ॲक्सेपटन्स) या दोन बाजू होत्या. त्यात पालकांनी १०० टक्के गुण ॲक्सेपटन्सला दिले.
- दुसऱ्या परिस्थितीस सी.आर.एल.एन. (केअरलेसनेस) विरुध्द ओव्हर प्रोटेक्शन यास पालकांनी ९८ टक्के गुण प्रोटेक्शनला दिले तर २ टक्के गुण हे केअरलेसनेसला दिले.
- तिसऱ्या परिस्थितीत गिलीजन्स विरुध्द ओव्हर अन्डयूजीन्स यामध्ये ओव्हर इन्डयूजीन्स याला ९२ टक्के गुण तर निगलीजन्सला ८० टक्के गुण दिले.
- चौथी परिस्थिती यात स्ट्रॅांग रीलीजम व ऑटोपीन एक्सपेक्टेशन्स यामध्ये स्ट्रॅांग रीलीजम ला ५० टक्के गुण तर ऑटोपीन एक्सपेक्टेशन्स याला ५० टकके गुण दिले.
- पाचव्या परिस्थितीत लीनीयन्ट स्टॅन्डड विरुध्द सीव्हीयर मॉरेलीझम यात लीनीयन्ट स्टॅन्डर्ड यांना ५८ टक्के तर मॉरेलीझम याला ४२ टक्के गुण दिले.

- सहाव्या परिस्थितीत टोटल फ्रीडम आणि सिव्हीयर डिस्प्लीन यात टोटल फ्रीडमाला ५८ टक्के पालकांनी गुण दिले तर सिव्हीयर डिस्प्लीन याला ४२ टक्के पालकांनी गुण दिले.
- सातव्या परिस्थितीत मॅरीटल कॉनफिल्कट विरुध्द मॅरीटल ॲडजस्टमेंट यात मॅरीटल कॉनफिल्टला ८ टक्के पालकांनी गुण दिले, तर मॅरीटल ॲडजस्टमेंटला ९४ टक्के पालकांनी गुण दिले.
- आठव्या परिस्थितीत फॉल्टी रोल एक्सपेक्टेशन विरुध्द रीॲलेस्टीक रोल एक्सपेक्टेशन यात फॉल्टी रोल एक्सपेक्टेशन ८ टक्के पालकांनी गुण दिले, तर रीॲलेस्टीक रोल एक्सपेक्टेशन याला ९२ टक्के पालकांनी गुण दिले.

**चाचणीमध्ये दिलेल्या ८ परिस्थिती व त्यात मिळालेले गुण :-**

A - ACCEPTANCE
R - REJECTION
O.P. - OVER PROTECTION
C - CARELESSNESS
N - NEGLIGENCE
O.I. - OVER INDULGENCE
S - STRONG REALISM
U - UTOPIN EXPECTATION
L - LINIENT STANDARDS
S - SEVERE MORALISM
T - TOTAL FREEDOM
S - SEVENRE DISCIPLINE
M - MARITAL CONFLICT
M.A. - MARITAL ADJUSTMENT
F - FAULTY ROLE EXPECTATION
R - REALISTIC ROLE EXPECTATION

**चाचणीवरुन मिळालेला गुणांकन तक्ता :-**



**निष्कर्ष :-** वरील संशोधनावरुन असे लक्षात येते की, आजचे पालक मुलांबद्दल अधिक जागरुक आहेत. मुलांचे अतिसंरक्षण करणे, त्याचे लाड पुरविणे, त्यांना हवी असणारी प्रत्येक गोष्ट मिळवून देण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करणारे पालक आज दिसून आले.

या सर्वाचे महत्वाचे कारण म्हणजे प्रत्येक कुटुंबामध्ये दिसून येणारी मुलांची मर्यादित संख्या तसेच कुटुंबाचे बदलते स्वरुप, तसेच मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना जास्त मोकळीक देवू न शकणे इ. सर्व कारणांमूळे पालकांचा मुलांबाबतचा दृष्टीकोन बदलत आहे हे दिसून यते.

या सर्वांचा परिणाम म्हणून मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता दिसून येवू शकते. मुले इतरांना मध्ये मिसळू शकत नाहीत. मुलांमध्ये असणाऱ्या क्षमतांना, त्यांच्या अंगी असणाऱ्या कौशल्यांना वाव मिळू शकत नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. डॉ.प्रतिभा अहिरे (पेज नं. ६०-६३) समाजशास्त्र (संकल्पना व व्यक्ती)
२. प्रा.त्रिवेणी फरकाडे, सौ.सुलभा गोंगे (पेज नं. ८०) (विवाह आणि कौटुंबिक संबंध)
३. डॉ.राम कुलकर्णी, व्यक्तीमत्व विकास, प्रथम आवृत्ती १२ जानेवारी, १९९४ (युवकदिन)
४. प्रा.प्रियवंदा रा.लाडकर, मातृकला व बालविकास (पेज नं. ३०५-३११)
५. मानसशास्त्र १२ वी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. २०१३ (पेज नं.१५-१७)
६. मानसशास्त्र ११ वी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. २०१२ (पेज नं. ३२)




**Sheela B. Jire**